POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७६ ● मुंबई, बुधवार, २८ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# कोंकण विभाग स्तरावरील प्रजासत्ताक दिन
## विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न
## पोलीस दलातील उल्लेखनीय कामगिरी करणारे अधिकारी यांचा गौरव



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ७७ वा वर्धापन दिनाचा कोकण विभाग स्तरावरील ध्वजारोहण समारंभ आज कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते संपन्न झाला. नवी मुंबई पोलीस मुख्यालय मैदान, सेक्टर-१७, कळंबोली येथे हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, मान्यवर, नागरीक आणि शालेय विद्यार्थी आदींना विभागीय आयुक्तांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या समारंभास नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी परेड कमांडर श्रीमती प्रेरणा कट्टे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांच्या नेतृत्वाने राखीव पोलीस मुख्यालय नवी मुंबई, एस.आर.पी.एफ,ग्रुप नं. ११ प्लाटून, क्यु .आर.टी.पथक, नवी मुंबई, आर.सी.पी.पथक, नवी मुंबई, नवी मुंबई पोलीस पथक, नवी मुंबई महिला पोलीस



पथक, नवी मुंबई वाहतूक पोलीस पथक, डॉग स्कॉड बॉम्ब शोधक/नाशक पथक, बँड पथक, वरुन वाहन, वज्रवाहन, निर्भया पथक इरटिगा, फायर बुलेट, निर्भया पथक ॲक्टीव्हा, अग्निशामक रेस्क्यु व्हॅन सिडको आदीनी विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी पोलीस दलातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झालेले पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागतर्फे नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.३६ कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.११२ करावे गांव, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.१५ शिरवणे, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.९३ सीवुड, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.१०२ नेरुळ, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.१०१ शिरवणे या सहा शाळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटाने त्यांना प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमास अतिरिक्त विभागीय आयुक्त कोकण विभाग श्री.सिध्दाराम सालीमठ, सहआयुक्त (नियोजन) प्रमोद केंभावी, उपर आयुक्त (विकास) डॉ.माणिक दिवे, सहआयुक्त (पुर्नवसन) श्री.रवि पाटील, सहआयुक्त (करमणूक व शुल्क) श्री.रविंद्र पवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, वरिष्ठ पोलीस अधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे उत्कृष्ठ सूत्रसंचलन केल्याबद्दल शुभांगी पाटील आणि निंबाजी गीते यांना विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.







## प्रजासत्ताक दिनाची अनोखी भेटः तुळींज पोलिसांकडून ५८ हरवलेले मोबाईल नागरिकांच्या हाती

■**नालासोपारा। प्रतिनिधी,**

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन २६ जानेवारी २०२६ रोजी ५,८०,०००/- रुपए किंमतीचे हरवलेले ५८ मोबाईल फोनचा शोध घेवुन तक्रारदारांना परत केले. तुळींज पोलीस ठाणेची उल्लेखनिय कामगिरी. अधिकमाहितीनुसार तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्तीचे तसेच गर्दीचे ठिकाणे असुन, दैनंदिन कामाचे घाईगडबडीमध्ये रेल्वे स्टेशन परिसर तसेच सेंट्रल पार्क, ओसवाल नगरी आठवडा बाजार दुबे इस्टेट, तुळींज ब्रिजखाली येथे लोकांचे मोबाईल फोन गहाळ झाल्या बाबत पोलीस ठाणे तसेच ऑनलाईन तक्रारी प्राप्त होत असतात.



मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तुळींज पोलीस ठाणे इथे दाखल प्रॉपर्टी मिसींगमधील गहाळ मोबाईल फोन यांचा कौशल्यपूर्ण व तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेवुन, २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन, पोलीस ठाण्यात नाविण्यपूर्ण उपक्रम राबवुन विविध कंपन्यांचे एकुण ५,८०,०००/-रुपए किंमतीचे नागरिकांचे हरवलेले एकुण ५८ मोबाईल फोन तक्रारदार यांना मा. वरिष्ठांच्या हस्ते परत दिले आहेत. सदर बाबत तक्रारदार यांनी त्यांचा हरवलेला मोबईल फोन परत मिळाल्याने समाधान व्यक्त करून, पोलीसांचे कामगिरीचे कौतुक केले आहे.

सदरची कामगीरी मा. श्रीमती. पोर्णिमा चौगुले श्रींगी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, मा. श्री. उमेश माने पाटील, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय जाधव, पोलीस निरीक्षक गुन्हे बाळासाहेब बनकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) आनंद पेंडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुनिल पवार, पोहवा/अशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, डिगांबर परजने, श्रीधर कांबळे, इस्माईल शाह छपरीबन, राहुल कदम, अक्षय झांजुनें, पोअंम / प्रसाद पालवे, प्रकाश दवने, अनिल सोनवणे, ज्योतीराज झंजे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## हिवाळ्यात 'या' जिल्ह्यांत अवकाळी पावसाची शक्यता



■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील वातावरणात काही प्रमाणात बदल होण्याची शक्यता आहे. तर तापमानात काही प्रमाणात वाढ होईल, बंगालच्या उपसागरात तयार होणाऱ्या कमी दाबाच्या प्रणालीमुळे मराठवाड्यात काहीअंशी प्रमाणात पावसाचा अंदाज असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. जाणून घेऊयात २७ जानेवारी रोजी राज्यातील एकूण हवामान परिस्थितीचा अंदाज.

- **कोकण :** कोकण विभागात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई-ठाणे परिसरात धुके राहण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी अंशतः ढगाळ वातावरणाची राहील, असा हवामान विभागाने अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता अधिक असून समुद्रकिनारी मध्यम ते वेगाने वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर आणि कोल्हापुरातील काही जिल्ह्यांमध्ये हवामान हे मुख्यत्वे कोरडं राहण्याची शक्यता आहे. सकाळी काही प्रमाणात थंडावा जाणवेल, तर दुपारी उष्णता वाढेल.
- **मराठवाडा :** मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरणाचे अधिक प्रमाण राहण्याची शक्यता आहे. आज आणि उद्या म्हणेजच २७-२८ जानेवारी रोजी मोजक्याच ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाचा अंदाज आहे. तसेच सकाळी धुक्याची झालर राहील असा हवामान विभागाने अंदाज वर्तवला आहे.
- **विदर्भ :** विदर्भातील नागपूर, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांत हवामान कोरडं राहण्याची शक्यता आणि ढगाळ वातावरणाची शक्यता आहे. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता आहे.

## राज्य मंत्रिमंडळाचा बैठकीत सरकारचे ४ सर्वात मोठे निर्णय!



■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्य मंत्रिमंडळाची मंगळवारी (२७ जानेवारी) आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. युवकांसाठी रोजगार, कंत्राटदारांची थकित बिले, शासकीय जमीनीच्या भाडे पट्टे कालावधी अशा वेगवेगळ्या मुद्द्यावर या बैठकीत सखोल चर्चा झाली आणि या क्षेत्राशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे आता युवकांना रोजगार मिळण्याची संधी वाढणार आहे. तसेच राज्य सरकारने या बैठकीत आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारने शत्रू संपत्तीच्या विक्री-खरेदीसाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचे ठरवले आहे.

- **मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणकोणते निर्णय :** औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये 'पीएम सेतू' योजना राबविण्यात येणार आहे. होतकरू युवकांना दिलासा मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अंमलबजावणी केली जाईल. पुढच्या टप्प्यात राज्यातील अन्य संस्थांचा समावेश होणार आहे. पीएम सेतूमुळे उमेदवारांना रोजगार संधी मिळवणे सोपे होणार आहे.
- **प्रलंबित देयके अदा करण्यासाठी ट्रेड्स प्लॅटफॉर्म :** कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी ट्रेड्स प्लॅटफॉर्म सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडित सूक्ष्म, लघू व मध्यम कंत्राटदार-उद्योजकांसाठी ही सुविधा असेल.
- **जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणीचे पुनरूज्जीवन :** धुळे येथील जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणीचे पुनरूज्जीवन करण्याचाही निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांच्याकडे तशी शिफारस केली जाणार आहे.
- **शत्रूची संपत्ती विकण्यासाठी मुद्रांक शुल्क माफ :** वेगवेगळ्या कारणांसाठी देण्यात येणाऱ्या शासकीय जमीनीच्या भाडे पट्टे कालावधी वाढवून देण्याचाही निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. विशेषतः ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येणाऱ्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदी अन्वये शासकीय जमिनींचा कालावधी वाढवून देण्यात येईल. तसेच केंद्र सरकार किंवा राज्य शासनाच्या ताब्यातील शत्रू संपत्तीच्या विक्री-खरेदीसाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## जन्मदात्या आईनेच ११ वर्षांच्या मुलाला संपवलं
### मुलीवरही सपासप हल्ला, रक्ताने माखलेलं घर पाहून पोलीसही सुन्न




**महिलेची ओळख काय?**
ही घटना वाघोली येथील बाईफ रोड परिसरात घडली. सोनी संतोष जायभाय (मूळ रहिवासी कंधार, जिल्हा नांदेड) सध्या वाघोली येथे बायफ रोडवर वास्तव्यास असलेल्या या महिलेने हे कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत ११ वर्षांचा मुलगा साईराज संतोष जायभाय याचा जागीच मृत्यू झाला. तर १३ वर्षांची मुलगी धनश्री संतोष जायभाय गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात एक हादरवणारी घटना घडली असून, पोलीस यंत्रणांनाही घटनेमुळं धक्का बसला आहे. पुण्यातील वाघोली इथं आईच्या हातून एक धक्कादायक कृत्य घडलं आहे, जिथं ११ वर्षांच्या मुलाची हत्या झाली असून, आईनंच मुलीवरही प्राणघातक हल्ला केला.

पुण्यातील वाघोली परिसरातून एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. एका आईने स्वतःच्या ११ वर्षांच्या मुलाचा गळा चिरून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. याच घटनेत १३ वर्षांच्या मुलीवरही प्राणघातक हल्ला करण्यात आला असून, सुदैवाने ती मुलगी बचावली आहे. वाघोलीत अवघ्या दोन दिवसांत घडलेली ही दुसरी निर्दयी घटना असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

वाघोलीतील या घटनेनंतर सदर परिसरात प्रचंड तणावाचं वातावरण पाहायला मिळत आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी आरोपी महिलेला ताब्यात घेतलं असून, नेमकं हे कृत्य का करण्यात आलं, याचा तपास सुरू आहे. मात्र अद्याप हत्येमागचं गूढ कायम आहे. हत्या करण्यामागे कौटुंबिक वाद की मानसिक तणाव? यामागचं नेमकं कारण शोधण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत. वाघोलीत सतत घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांचं अशा घटनेकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे अशी कुजबूज स्थानिकांमध्ये पाहायला सुरू आहे. मात्र आता या हादरवणाऱ्या घटनेनंतर पोलीस तपासातून नेमकी कोणती बाब आणि गुपितं उघडकीस येतात हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ७६ वर्षांत काय कमावले?

भारतात आधुनिक प्रजासत्ताक व्यवस्था स्थापन होऊन ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी १९५० या दिवशी भारताने नवीन राज्यघटना स्वीकारली. आज जग संक्रमणकाळाच्या उंबरठ्यावर उभे असतांना भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताकदिनी यावर ऊहापोह होणे, ही काळाची मागणी आहे. प्रजासत्ताक, म्हणजेच प्रजेचे राज्य! आज ही राज्यव्यवस्था प्रचलित असून यास आदर्श मानले जात असले, तरी ही व्यवस्था भारतात अनादी काळापासून अस्तित्वात होती. आधुनिक भारताचे द्वितीय राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी म्हटले आहे, 'भारताचे राजकारण हे एका प्राचीन नैतिक व्यवस्थेची अभिव्यक्ती आहे. आधुनिक लोकशाहीच्या पुष्कळ आधीच भारतीय संस्कृतीने शासकांवर नियंत्रण (राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश), सार्वजनिक उत्तरदायित्व आणि नैतिक शासन या मूल्यांचा स्वीकार केला होता.' डॉ. राधाकृष्णन् यांच्या या दृष्टीकोनाला प्रसिद्ध गांधीवादी चिंतक धर्मपाल हे आणखी पुढे घेऊन जातात. 'द ब्युटीफुल ट्री' या त्यांच्या पुस्तकात ते लिहितात, 'भारतीय गावे, संस्था, संघटना आणि समुदाय हे स्वीकृती अन् सामूहिक निर्णय यांद्वारे स्वतःचा कारभार चालवत असत. ब्रिटीश वसाहतवादाने आधीपासूनच कार्यरत असलेल्या स्वदेशी प्रजासत्ताक व्यवस्थेत व्यत्यय आणला!' धर्मपाल, डॉ. राधाकृष्णन् आदी विभूतींची ही निरीक्षणे भारतीय लोकशाही आणि प्रजासत्ताक यांचे वेगळेपण दर्शवतात. आजची भारतीय राज्यघटना ब्रिटन, अमेरिका, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सोव्हिएत संघ, जपान, जर्मनी या देशांच्या, म्हणजेच पाश्चात्य राज्यघटनांचा काही भाग घेऊन बनवण्यात आली आहे. भलेही पालटत्या काळानुसार राज्यव्यवस्था चालवण्याचे प्रायोगिक धोरणे पालटावी लागत असली, तरी त्यामागील नीती आणि वैचारिक प्रगल्भता मूळ संस्कृतीशी निगडित असणे आवश्यक असते. काँग्रेसच्या ६ दशकांच्या सत्ताकाळात या सगळ्यावर तिलांजली देऊन भारतीय समाजाची राखरांगोळी करण्यात आली. आज त्या प्रयत्नांच्या दुष्परिणामांवर हळूहळू का असेना? पण सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे कार्य काही पिढ्यांचे असले, तरी त्याचा शुभारंभ झाला आहे. प्रजेचे हित जो जाणतो, तो राजा. आज पाहिले, तर भारताला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने एक प्रखर राष्ट्रनिष्ठ (म्हणजेच हिंदुत्वनिष्ठ), तत्त्वचिंतक, धार्मिक आणि आध्यात्मिक नेता लाभला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने आज अनेक क्षेत्रांत यश पादाक्रांत केले आहे. भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली असून काही वर्षांत जर्मनीला मागे टाकून ते तिसऱ्या क्रमांकावर आरूढ होईल. काही शतक आधीपर्यंत जागतिक 'जीडीपी'ते एकटा भारतच तब्बल ३३ टक्के योगदान देत असे. इस्लामी आक्रमक आणि ब्रिटिश यांनी भारताला लुटून दरिद्री बनवले; परंतु भारतियांमध्ये असलेल्या मूळ दैदिप्यमान गुणसूत्रांमुळे आज भारत पुन्हा त्याच्या गौरवशाली इतिहासाला वर्तमानात उतरवण्यासाठी उभा ठाकला आहे. तथापि हेही विसरून चालणार नाही की, भारताची एकूण लोकसंख्या पहाता अर्थव्यवस्था ४.१८ ट्रिलियन डॉलरची (३८३ लाख कोटी रुपयांची) असली, तरी दरडोई उत्पन्न हे अजूनही २ सहस्र ८०० डॉलर, म्हणजे अत्यल्प आहे. अधिक लोकसंख्या असलेल्या चीन आणि अमेरिका यांच्याशी या आकड्याची तुलना करणे वस्तूनिष्ठ ठरेल. चीनचे दरडोई उत्पन्न १३ सहस्र ८०० डॉलर, तर अमेरिकेचे ८९ सहस्र ६०० डॉलर इतके आहे. दरडोई उत्पन्नात १९७ देशांच्या सूचीत भारत १४४ व्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अनुमानानुसार हा आकडा वर्ष २०३० पर्यंत ४ सहस्र डॉलरपर्यंत पोचेल. यातून आपल्याला आर्थिक सक्षमतेच्या दृष्टीने किती लांबचा टप्पा गाठायचा आहे, हे लक्षात येऊ शकते. 'विकसित भारत २०४७'च्या पंतप्रधानांनी आपल्यासमोर ठेवलेल्या ध्येयासमोरील आव्हाने पेलण्याची क्षमता प्रजासत्ताक भारताला पुढील २१ वर्षे आपल्या अंगी निर्माण करावी लागणार आहे. आर्थिक सक्षमतेसह सांस्कृतिक स्तरावर भारताने सक्षम होणे आवश्यक आहे. आज सांस्कृतिक राष्ट्रवादाचे वारे वहात आहेत, असे म्हटले जाते. आपल्या प्राचीन हिंदु मंदिरांचा जीर्णोद्धार केला जात आहे. ५५० वर्षांच्या इस्लामी अतिक्रमणापासून अयोध्येला मुक्ती तर मिळाली; परंतु अन्य तीर्थक्षेत्रांची काय कथा आहे ? कालच्या शुक्रवारी वसंतपंचमी आल्याने हिंदूंना भोजशाळेत सरस्वतीमातेचे पूजन करण्यासाठी संघर्ष करावा लागला. काशी विश्वनाथ, संभलचे हरिहर मंदिर, ताजमहाल आदी असंख्य हिंदुक्षेत्रांना काफिरांच्या शत्रूंपासून मुक्त करणे आवश्यक आहे. या सगळ्यात येणारा अडथळा, म्हणजे 'प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट १९९१'. भारताच्या राज्यघटनेतील या काळ्या डागाला पुसून काढणे आवश्यक आहे. या जोडीला आज अनेक ठिकाणी 'कॉरिडॉर संस्कृती'च्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांचे सुशोभीकरण केले जात आहे; परंतु त्या माध्यमातून तेथील सात्त्विकतेला बगल दिली जात नाही ना ? ओडिशातील प्रखर हिंदुत्वनिष्ठ लेखक श्री. अनिल धीर यांच्या मते कॉरिडॉर मोहिमेतून तीर्थक्षेत्रांतील श्रद्धा, भाव आणि स्पंदने नष्ट होता कामा नयेत. गोव्यासारख्या सर्वांत सात्त्विक राज्यांची स्थिती पहा. येथे आध्यात्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न होत आहे. उद्देश चांगला आहे; पण 'गोवा हा सन, सँड आणि सी एवढेच नाही', असा प्रचार करण्यापेक्षा 'गोवा हा सन, सँड आणि सी नाही', हे सांगून येथील मंदिरांचा पुरस्कार केला जावा. त्यामुळे भक्तीभाव असलेले लोक गोव्यातील मंदिरे पहाण्यास येतील. सध्या भक्तीचा लवलेश नसलेलेही अनेक पर्यटक मंदिरे पहाण्यास येत आहेत, अशी स्थिती आहे. त्यामुळे हा प्रकार मंदिर संस्कृतीला बाधक ठरत आहे का? याची पडताळणी झाली पाहिजे. यासाठी येथील मंदिर समित्यांची आध्यात्मिक भूमिका समजून घेतली जावी. यामुळेच भारताचे सांस्कृतिक पुनरुत्थान होण्यासाठी भगीरथ प्रयत्नांची आवश्यकता आहे. परराष्ट्र नीती आणि संरक्षण सक्षमता आदींच्या संदर्भातसुद्धा भारताला योग्य दिशेने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहेच. भारतियांनो, ७७ व्या प्रजासत्ताकदिनी या सगळ्या गोष्टींचा लेखाजोखा करून आपण काय कमावले, याचा विचार करा. आपल्याला कोणत्या मार्गाने पुढे जायचे आहे, हे ठरवा. काळाच्या या उंबरठ्यावर अमेरिकेतील प्रखर हिंदुत्वनिष्ठ श्री. राजीव मल्होत्रा यांच्या चिंतनाचा उल्लेख झाला पाहिजे. ते म्हणतात, 'भारतीय लोकशाही ही 'धर्माधारित' बहुलवादाची अभिव्यक्ती आहे, ना की गेल्या दोन-तीनशे वर्षांतील उदारमतवादी सिद्धांतांची... !' त्यांच्या म्हणण्यानुसार भारताने धर्म विसरता कामा नये. धर्म विसरलो, तर जी अवस्था काँग्रेसच्या काळात झाली, ती पुन्हा यायला वेळ लागणार नाही. धमार्चे रक्षण करा, तो तुम्हाला तारेल. धर्मेण जयति राष्ट्रम्।

# निवडणुकांचा लोचा झाला तर लोकशाही धोक्यात!

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल नाहीत, तर ते आजच्या भारतीय लोकशाहीच्या वास्तवावर शिक्कामोर्तब करणारे आहेत. महागाईने होरपळलेली जनता, बेरोजगारीमुळे नैराश्यग्रस्त तरुण, खड्डयांत गेलेले रस्ते, कोलमडलेली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, बंद पडर्णाया मराठी शाळा आणि मराठी भाषेच्या अस्तित्वावर आलेले संकट. एवढे सगळे गंभीर प्रश्न समोर असताना सत्ताधारी पक्षाने प्रचंड यश मिळवले, ही बाब धोक्याची घंटा आहे. हा निकाल जनतेच्या समाधानाचे द्योतक नाही, तो आहे पैशाच्या, सत्तेच्या, भीतीच्या आणि माध्यमांच्या संगनमतातून उभ्या राहिलेल्या निवडणूक व्यवस्थेचा परिणाम.

महानगरपालिका म्हणजे लोकांच्या रोजच्या जगण्याशी थेट संबंधित असलेली संस्था. पाणी वेळेवर येते की नाही, रस्त्यावरून चालताना जीव वाचतो की नाही, आजारी पडल्यानंतर सरकारी दवाखान्यात उपचार मिळतात की नाही, मुलांना परवडर्णाया शिक्षणाची सोय आहे की नाही, या सगळ्याचा निर्णय महापालिकांच्या कारभारातून होतो. आजचे वास्तव काय आहे? महापालिकांचे बजेट कॉन्ट्रॅक्टर, बिल्डर आणि खासगी कंपन्यांच्या घशात घातले जात आहे. रस्ते दर पावसाळ्यात उखडतात, पण कंत्राटदार मात्र श्रीमंत होत जातात. सरकारी रुग्णालये दुर्लक्षित ठेवून खासगी रुग्णालयांना पाठीशी घातले जाते. शिक्षण क्षेत्रात मराठी शाळा मोडकळीस आणून इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळांना प्रोत्साहन दिले जाते. ही सगळी धोरणे जाणीवपूर्वक राबवली जात आहेत. यामुळे सामान्य माणसाला जगणे कठीण होऊन जाणार आहे. सरकार जेव्हा आपल्या जबाबदारीपासून दूर जायला लागते, तेव्हा सामान्य माणूस त्यात भरडला जातो. खासगी भांडवलदारांना फक्त पैसा कमावायचा असतो, तिथे मानवतावादी दृष्टिकोन राहत नाही.

एकीकडे डाळ, तेल, गॅस, वीज, वाहतूक सर्वच गोष्टी सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहेत. बेरोजगारी ही तर तरुण पिढीची कायमची समस्या बनली आहे. 'विकास' आणि 'स्मार्ट



प्रागतिक विचारांच्या दृष्टिकोनातून पाहता, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांची स्वायत्तता संपून जात आहे. आयोगाने निष्पक्ष मध्यस्थाची भूमिका बजावण्याऐवजी सत्ताधाऱ्यांना मोकळे रान दिल्याचे चित्र दिसते. विरोधी पक्षांच्या तक्रारी दुर्लक्षित केल्या जातात, कारवाई विलंबाने किंवा प्रतिकात्मक केली जाते, तर सत्ताधाऱ्यांच्या गंभीर उल्लंघनांवर सौम्य भूमिका घेतली जाते. निवडणूक आयोग हा लोकशाहीचा पहारेकरी असतो. पण जेव्हा तो पहारेकरीच सत्तेच्या दबावाखाली निष्क्रिय होतो, तेव्हा निवडणूक प्रक्रिया ही निव्वळ औपचारिकता ठरते.

सिटी'च्या घोषणांच्या आड प्रत्यक्षात नोकऱ्या नाहीत, सुरक्षित रोजगार नाही, आणि असंघटित कामगारांचे शोषण वाढत आहे. अशा परिस्थितीत सत्ताधाऱ्यांविरोधात तीव्र जनक्षोभ उभा राहायला हवा होता. पण तो का दिसत नाही, हा खरा प्रश्न आहे. दुसरीकडे निवडणुकांमध्ये पैशाचा वापर इतक्या उघडपणे झाला की निवडणूक आयोग, प्रशासन आणि सत्तेची यंत्रणा यांची भूमिका संशयास्पद ठरते. उमेदवार विकत घेणे, मतदारांना रोख रक्कम, दारू, वस्तू वाटप करणे, प्रचारासाठी अमर्याद खर्च करणे हे सगळे 'निवडणूक रणनीती' म्हणून खुलेआम स्वीकारले गेले. प्रागतिक विचारसरणीच्या भाषेत सांगायचे तर, ही भांडवली लोकशाहीची उघडी हुकूमशाही आहे. इथे मत हे नागरिकाचे हक्क राहिलेले नाही, ते विक्रीसाठी ठेवलेला माल बनले आहे. ज्याच्याकडे पैसा, त्याच्याकडे सत्ता हे समीकरण आता निर्लज्जपणे मान्य केले जात आहे. तसेच निवडणुकांचे आणखी एक भीषण वास्तव म्हणजे विरोधी पक्षांतील तथाकथित 'मोठ्या नेत्यांचे' सत्ताधारी पक्षात मोठ्या प्रमाणावर झालेले स्थलांतर. हे नेते कोणत्या विचारसरणीचे होते, कोणत्या मूल्यांची शपथ घेत होते, याला काहीही अर्थ उरलेला नाही. हे लोक जनतेचे प्रतिनिधी नाहीत, तर सत्तेचे दलाल आहेत. जिथे सत्ता, पैसा आणि संरक्षण मिळेल तिकडे ते जातात. यामुळे जनतेचा राजकारणावरील विश्वास संपुष्टात येतो आणि लोकशाही पोकळ बनते.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगाची भूमिका गंभीर प्रश्न निर्माण करणारी ठरली आहे. पैशाचे खुले वाटप, आचारसंहितेचे सर्रास उल्लंघन, सरकारी यंत्रणांचा प्रचारासाठी वापर, सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून उघड धमकीवजा भाषणे हे सगळे प्रकार सर्वांसमोर घडत असताना निवडणूक आयोगाने डोळेझाक केली. एकूण निवडणूक प्रक्रियेत प्रचंड गोंधळ, संशयित वातावरण आणि निवडणुकीत आयोगाची बघायची भूमिका ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. अशा वेळी दिवंगत केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीत. शेषन यांनी मतदान प्रक्रियेत शिस्त आणली. उमेदवाराने किती खर्च करावा यावर मर्यादा आणली. निवडणुका कशा प्रकारे घ्याव्यात याचे नियम ठरलेले आहेत, पण निवडणूक आयुक्तांनी त्याची अंमलबजावणी करायची असते. ते प्रशासनाचा भाग असतात. प्रशासन हे लोकशाहीच्या चार आधारस्तंभांपैकी एक आहे. त्यामुळे तोही तितकाच तोलामोलाचा असतो. सरकारकडून आपल्याला वेतन मिळते म्हणून त्यांच्या हुकमाचे ताबेदार बनू नये. तसे झाले तर निवडणूक आयोगाची स्वायत्तता धोक्यात येईल. त्यामुळे लोकांचा त्यांच्यावर जो विश्वास आहे, तो संपून जाईल. त्यामुळे त्यांच्या सगळ्या निर्णयावर लोक शंका घेऊ लागतील. त्यामुळे फिक्स झालेल्या मॅचमध्ये लोकांनाही काही रुची राहत नाही, तशी परिस्थिती होऊन बसेल. याचा विचार निवडणूक आयुक्तांनी करायला हवा. महाराष्ट्रात २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचा सुपडा साफ झाला. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत अनपेक्षितपणे महायुतीला प्रचंड यश मिळाले. त्यामुळे विरोधात असलेल्या महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा नेला होता. हे निवडणूक आयोगाला शोभणारे नाही.

प्रागतिक विचारांच्या दृष्टिकोनातून पाहता, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांची स्वायत्तता संपून जात आहे.

आयोगाने निष्पक्ष मध्यस्थाची भूमिका बजावण्याऐवजी सत्ताधार्यांना मोकळे रान दिल्याचे चित्र दिसते. विरोधी पक्षांच्या तक्रारी दुर्लक्षित केल्या जातात, कारवाई विलंबाने किंवा प्रतिकात्मक केली जाते, तर सत्ताधाऱ्यांच्या गंभीर उल्लंघनांवर सौम्य भूमिका घेतली जाते. निवडणूक आयोग हा लोकशाहीचा पहारेकरी असतो. पण जेव्हा तो पहारेकरीच सत्तेच्या दबावाखाली निष्क्रिय होतो, तेव्हा निवडणूक प्रक्रिया ही निव्वळ औपचारिकता ठरते. ही स्थिती म्हणजे लोकशाहीचा अंतर्गत ऱ्हास आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे माध्यमे म्हणजेच कॉर्पोरेट भांडवलदारांच्या ताब्यात गेलेली आहेत. त्यामुळे माध्यमे ही या व्यवस्थेची सर्वात मजबूत ढाल बनली आहेत. महागाई, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण यावर चर्चा करण्याऐवजी भावनिक मुद्दे, जात-धर्माचे राजकारण, बनावट राष्ट्रवाद आणि व्यक्तिपूजा यांचा मारा केला जातो. प्राकृतिक विचारवंत याला 'खोटी जाणीव' म्हणतात. जनतेला त्यांच्या खऱ्या वर्गीय प्रश्नांपासून दूर ठेवून भावनिक घोषणांत अडकवले जाते. परिणामी शोषित वर्ग स्वतःच्या शोषकांच्या बाजूने मतदान करतो. हीच या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

आणखी ज्वलंत मुद्दा म्हणजे महानगरपालिकांच्या कारभारात मराठी भाषा आणि मराठी शाळा दुय्यम ठरवल्या जात आहेत. मराठी शाळा बंद केल्या जात आहेत. शिक्षकांची पदे भरली जात नाहीत, आणि शिक्षणाचे पूर्ण खासगीकरण होत आहे. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती सांस्कृतिक आणि सामाजिक अस्तित्वाचा प्रश्न आहे. मराठी भाषेचे दुर्बल होणे म्हणजे स्थानिक जनतेचे राजकीयदृष्ट्या दुर्बल होणे. हे धोरण अपघाताने नाही, तर भांडवली आणि कॉर्पोरेट हितसंबंधांशी सुसंगत असेच राबवले जात आहे. मग प्रश्न उरतो, सत्ताधाऱ्यांना मिळालेल्या या यशाला काय म्हणावे? याला 'लोकमान्यता' म्हणता येणार नाही. हे आहे निवडणुकात्मक सत्तावाद, पैशावर आधारित राजकारण आणि भांडवली हुकूमशाहीकडे वाटचाल. निवडणुका होतात, पण निवडणुका न्याय्य नाहीत. लोकशाही आहे, पण ती केवळ कागदावर आहे. केवळ कागदी घोडे नाचवून जमत नसते.

अशा या परिस्थितीत प्रागतिक चळवळीसमोरील ऐतिहासिक जबाबदारी येते. प्राकृतिक चळवळींनी आत्मपरीक्षण करण्याची आणि नव्या ताकदीने रस्त्यावर उतरायची गरज आहे. केवळ निवडणूक युती, जागावाटप किंवा घोषणांपुरते राजकारण पुरेसे नाही. कामगार, कष्टकरी, महिला, तरुण, विद्यार्थी, शेतकरी, शहरी गरीब मध्यमवर्ग यांना त्यांच्या प्रश्नांभोवती संघटित करणे हेच खरे आव्हान आहे. महापालिकांच्या पातळीवर संघर्ष, जनआंदोलन, पर्यायी विकास मॉडेल आणि लोकशाही नियंत्रण यांची उभारणी केल्याशिवाय या पैशाच्या राजकारणाला रोखता येणार नाही. महानगरपालिका निवडणुकांचे हे निकाल इशारा देणारे आहेत. जर पैशाच्या, माध्यमांच्या आणि सत्तेच्या जोरावरच राजकारण चालणार असेल, तर लोकशाहीचे रूपांतर हळूहळू उघड हुकूमशाहीत होईल.

प्रागतिक विचारसरणीसमोर आज एकच पर्याय आहे, तो म्हणजे समविचारी लोकांची एकजूट. लोकशाही, सामाजिक न्याय, भाषा, शिक्षण आणि कष्टकऱ्यांच्या व मध्यमवर्ग यांच्या हक्कांसाठी संघर्ष करून ही लोकशाही फक्त निवडणुकीतूनच नाही, तर रस्त्यावरून, चळवळीतून आणि संघटन मजबूत करून वाचवावी लागेल. त्यासाठी सगळ्यांनी सक्रिय होण्याची गरज आहे. कारण निष्क्रिय लोकांना कसलाच अधिकार राहत नाही.

# ठाकरे बंधू आत्मपरीक्षण करणार का?

**मुंबईसह महाराष्ट्रातील इतरही महानगरपालिकांच्या निवडणुका अखेर पार पडल्या. भारतीय जनता पक्षाने जवळपास निम्मे नगरसेवक निवडून आणताना २९ पैकी २३ महापालिकांमध्ये स्वबळावर किंवा सहकारी पक्षाच्या मदतीने महापौर निवडता येईल इतके बहुमतही मिळविले, भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विजयाचे शिल्पकार ठरले. सर्वाधिक उत्कंठा होती ती मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची; त्यातही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना कशी कामगिरी करते याची. ठाकरे यांच्या पक्षाला मुंबई महापालिकेतील सत्ता गमवावी लागली. मुंबईत भाजपला स्वबळावर महापौर निवडता येणार नसला तरीही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी असलेल्या युतीच्या मदतीने मुंबईत महापौरपद व सर्व सत्तापदे मिळविण्यामध्ये भाजप यशस्वी ठरणार हे स्पष्ट झाले आहे. साहजिकच आता प्रश्न आहे, उद्धव बाळासाहेब ठाकरे व त्यांचा पक्ष आत्मपरीक्षण करणार का?

मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेने गेली पंचवीस वर्षे सत्ता गाजविली. अर्थात या सर्व वेळेस भारतीय जनता पक्षाशी त्यांची युती होती, या युतीमध्ये भाजप नेहमीच लहान भावाच्या भूमिकेत राहिला. उपमहापौरपद व एखाद्या समितीचे अध्यक्षपद यापलीकडे भाजपच्या हातात काहीच आले नाही. इतकेच कशाला, २०१७ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे ८४ तर भाजपचे ८२ नगरसेवक निवडून आल्यानंतर भाजपने त्या पदांवरील हक्क सोडून सर्व पदे शिवसेनेला देऊ केली होती. त्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांपर्यंत युती कायम होती; पण २०१९मध्ये उद्धव ठाकरे यांनी निकालानंतर थेट काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत आघाडी करीत महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली आणि या युतीमध्ये बिघाड झाला. त्यापूर्वी २०१४च्या विधानसभा निवडणुकीमध्येही युतीमध्ये बिघाडी झाली होती, पण त्यानंतर सावरून घेण्याचीच भूमिका भाजपने घेतली होती. साहजिकच या निवडणुकीमध्ये काय होणार, असा प्रश्न होता. भाजप व शिवसेना युतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे व राज ठाकरे यांच्या शिवसेना व मनसे आघाडीवर निर्विवाद विजय मिळवून या प्रश्नाचे उत्तर दिले.

उद्धव ठाकरे यांच्या नगरसेवकांची संख्या गेल्या निवडणुकीपेक्षा कमी म्हणजे ६५ पर्यंत घसरली. राज ठाकरे यांची कामगिरीही घसरून सहापर्यंत आली. त्यांच्या आघाडीला ७१ जागा मिळाल्या. भाजपने गेल्या निवडणुकीपेक्षा सात जागा अधिक जिंकल्या. शिंदे यांच्या शिवसेनेशी त्यांची युती होती. त्यामुळे शिंदेंच्या २९ जागा या देखील भाजपच्या बाजूने मोजल्या, तर ८९ अधिक २९ म्हणजेच ११८ जागा होतात. साहजिकच आकड्यांच्या भाषेमध्ये ठाकरे बंधूंची पीछेहाट झाली. अर्थात हे फक्त मुंबईत नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातले चित्र आहे. राज ठाकरे यांच्या मनसेची स्थिती त्याहून बिकट आहे.

वास्तविक शिवसेना सातत्याने मराठी माणूस, मराठी अस्मिता व मुंबईतील मराठी माणसाचे अस्तित्व या विषयावर संघर्ष करीत आली आहे, किंबहुना त्या पक्षाची उभारणीच या विचारावर झाली आहे. या निवडणुकीमध्ये तब्बल अठरा वर्षांनी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले. त्यांनी मुंबईतील मराठी माणसाच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणून साथ द्या, अशी साद घातली. मराठीबहुल भागामध्ये शिवसेनेला मराठी मतदारांनी साथ दिलीही. पण त्यामुळे उर्वरित मुंबईमधून शिवसेनेला नेहमी मिळणारी साथ या वेळेस मिळाली नाही. मराठी विरुद्ध अमराठी असे झालेले ध्रुवीकरण हे भाजपच्या फायद्याचे ठरले आणि शिवसेनेने स्वतःचे नुकसान करून घेतले. टोकाला जाऊन मराठी अस्तित्वाची लढाई येथपर्यंत कथानक नेल्याने, आता यापुढे काय, असा प्रश्नही निर्माण होतो. ठाकरे बंधूंनी आपली शेवटची हुंडी वटविण्याचा प्रयत्न केला, त्याला मर्यादित यश आले.

खरे तर ठाकरे बंधूंकडे भरपूर वेळ होता. निवडणुका फेब्रुवारीअखेरपर्यंत घ्या, असे न्यायालयाने जाहीर करण्यापूर्वीही महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सगळ्यांना माहीत होते. या दोन बंधूंनी एकत्र निवडणूक लढवायची हे जूनमध्येच ठरविले होते. पण तपशील ठरविण्यासाठी त्यांना सहा महिने लागले. बहुधा दोन्ही ठाकरे एकत्र आले म्हणून मराठी माणूस भारावून जाऊन त्यांना भरभरून मतदान करील, अशी त्यांची अपेक्षा होती; पण तसे घडले नाही. मुंबईत असलेले शाखांचे जाळे ही शिवसेनेची ताकद होती. गेल्या वेळेस निवडून आलेल्या ८४ नगरसेवकांपैकी निम्मे नगरसेवक शिंदे यांच्या पक्षात गेले होते. हे जाळे खिळखिळे झाल्याची जाणीव ठाकरे बंधूंना होती. विधानसभा निवडणुकीमध्ये त्याचे परिणामही त्यांनी भोगले होते. तरीही हे जाळे पुन्हा विणण्यासाठी कोणतेही प्रयत्न करताना ठाकरे दिसले नाहीत. अगदी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यामध्ये शाखा भेटींना प्रारंभ झाला. वास्तविक उद्धव व आदित्य ठाकरे यांनी ठरविले असते तर गेल्या वर्षभरात त्यांना हे जाळे पूर्ववत करणे शक्य होते, पण तसे घडले नाही. बहुधा आपण लोकांमध्ये मिसळलो तर आपली 'ब्रँड व्हॅल्यू' कमी होईल, असे त्यांना वाटले असावे.


या निवडणुकांत उद्धव काँग्रेसपासून दूर गेले, ही त्यांच्या दृष्टीने वाईट गोष्ट होती. एकूण मतांची टक्केवारी पाहिली तर गेल्या काही निवडणुकांत मनसेच्या मतांच्या किमान दुप्पट ते अडीचपट मते काँग्रेसला मुंबईत मिळतात. साहजिकच काँग्रेसपासून दूर गेल्याचा फटका ठाकरे यांना बसला. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसबरोबर असल्याचा सर्वाधिक फायदा त्यांना झाला होता. त्यातच मुस्लिम व दलित मतदारांनी शिवसेनेला या वेळी फारशी साथ दिली नाही. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये मुंबईमध्ये या दोन्ही मतदारांनी शिवसेनेला मनापासून साथ दिली होती. आपली पारंपरिक मतपेढी शिवसेनेकडे सरकते आहे, असे मानणारा मोठा कार्यकर्ता वर्ग काँग्रेसमध्ये होता. तो आपल्या पक्षश्रेष्ठींना वारंवार ते सांगतही होता. या निवडणुकीमध्ये काँग्रेसने स्वतंत्र लढण्याची घेतलेली भूमिका व वंचित विकास आघाडीबरोबर आघाडी करण्याचा निर्णय हे त्याचेच निदर्शक होते.

मुस्लिम मतदार पूर्वीप्रमाणे आजही एकगठ्ठा मतदान करतो, पण पूर्वीप्रमाणे तो विशिष्ट पक्षाला बांधलेला नाही. पूर्वी तो काँग्रेसशी घट्ट बांधलेला होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष यांना थेट विरोध करण्याची ताकद ज्याच्यामध्ये आहे, त्याच्यामागे हा मतदार मोठ्या संख्येने उभा राहतो. महापालिका निवडणुकीमध्ये त्यांनी काँग्रेसबरोबरच 'एमआयएम'मागे आपली ताकद उभी करणे पसंत केले.

मुंबईवर लक्ष केंद्रित करताना ठाकरे बंधूंनी इतर शहरांमधील कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले. त्यांच्या प्रचाराचा सर्व भर मुंबईपुरताच मर्यादित राहिला. साहजिकच त्यांच्याकडे मोठ्या आशेने बघणाऱ्या राज्यभरातील कार्यकर्त्यांना त्यांनी निराश केले. त्याचाच परिणाम म्हणून मतदारांनीही त्यांच्याकडे साफ पाठ फिरवली. परभणी व नाशिक सोडले तर इतरत्र त्यांचा पक्ष दोन आकडी संख्या गाठू शकला नाही. अनेक ठिकाणी शून्यावरच समाधान मानावे लागले. त्यामुळे आता तरी त्यांना आत्मपरीक्षण गरजेचे आहे. मराठीचा मुद्दा मुंबईत लागू असला तरीही महाराष्ट्रात त्याचे अपील शून्य आहे. अशा स्थितीत ठाकरे बंधूंना आपल्या पक्षाची बांधणी पुन्हा करावी लागेल. पुढील तीन वर्षे कोणत्याही निवडणुका होणार नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांना देण्यासारखेही काही नसेल. त्या स्थितीत हे आव्हान अधिक बिकट होणार आहे. त्याची जाण ठेवून संपूर्ण महाराष्ट्र किमान आदित्य ठाकरे यांनी पालथा घातला तरीही त्यांना ही अस्तित्वाची लढाई लढण्यासाठी बळ मिळेल. प्रश्न एवढाच आहे, की ठाकरे बंधू आत्मपरीक्षण करणार का?

# घुसमटलेल्या मुंबईकराचा विस्फोट

मुंबई लोकलमध्ये यापूर्वी आपण बॉम्बचे विस्फोट घडवून आणल्यामुळे त्यात अनेक प्रवाशांचे जीव गेलेले पाहिले आहे, पण आता लोकलच्या भयंकर गर्दीला आणि चेंगराचेंगरीला कंटाळून त्यातील प्रवाशांचेच विस्फोट होऊन लागले आहेत. किरकोळ धक्का लागल्याच्या रागातून महाविद्यालीन प्राध्यापकांची पोटात चाकू खुपसून हत्या झाल्याचा प्रकार मालाड रेल्वे स्टेशनवर शनिवारी घडला. मुंबईच्या लोकल ट्रेनमधून ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये सर्वच वयोगटातील, व्यवसायातील, नोकरी करणारे, मजूर, खासगी तसेच सरकारी कर्मचारी असे सगळेच असतात. सकाळच्या वेळेत मुंबईकडे जाणारे आणि सायंकाळी पुन्हा विरार, वसई, कर्जत कसाऱ्याकडे परतणारे नियमित लोकल प्रवासी वर्षानुवर्षे प्रवास करत आहेत. लोकल प्रवासातील घुसमट, गर्दी, चेंगराचेंगरी आणि प्रवाशांनी 'प्रवासादरम्यान पत्करलेला जीवाचा धोका' रोजचाच असताना प्रवासीही त्याच्याशी जुळवून घेतात, त्यामुळे शक्यतो हाणामाऱ्या जरी झाल्या तरी हत्येचा प्रकार सहसा घडत नाही. प्रवाशांच्या हाणामारीत एका प्रवाशाने दुर्सया प्रवाशाला रेल्वे रुळावर ढकलून दिल्याने गाडीखाली सापडून प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना दोन वर्षांपूर्वी घडली होती. दरवाजात लटकलेल्या प्रवाशाचे खाली पडणे, रेल्वे रुळ ओलांडताना झालेले अपघात नवे नाहीत. उंट म्हातारा झाला की मालक त्याला वाळवंटात जिवंत गाडून मोकळे होतात, इतर उंट आपला भविष्यकाळ हतबल नजरेने पाहात असतात, असंच काहीसं चित्र रेल्वे अपघातात पाहायला मिळतं. लोकलच्या कोंडवाडावजा डब्यात जनावरासारखी भरली जाणारी माणसांची जीवघेणी गर्दी पाहिल्यावर मन विषण्ण होतं. भाकरीसाठी जीव धोक्यात घालणाऱ्या मुंबई ठाणेकरांचं स्पिरीटच्या नावाखाली होणारं 'हतबलतेचं कौतुक' आधी बंद व्हायला हवं. रेल्वेचा प्रवास रोजच माणसांना मारत असताना प्रवासी एकमेकांची शक्य तेवढी काळजी घेतात. आता प्रवासीच एकमेकांना मारायला लागल्यावर हे 'रोजचंच' आहे असं बोलून हा विषय सोडून देत येत नाही. रविवारी सुट्टीच्या दिवशीही मेगा ब्लॉकच्या जीवघेण्या दिव्यातून कुटुंबाला लोकलगर्दीत ढकलणारेही कमी नाहीत. लोकल गर्दीत चढता-उतरताना चेंगरल्याने लहान मुलांची रडारड, आयाबाया, म्हाताऱ्याकोताऱ्यांची जीवघेणी रविवारची कसरत टाळता येणार नाही का? महिलांच्या डब्यातील हाणामारी, चढताना-उतरताना होणारी दमछाक, धक्काबुक्की त्यातून होणारी हाणामारी तेवढ्यापुरती असली तरी ती कमालीची हिंसक असते. घर, कुटुंब, कार्यालय, भवतालचा तणाव, रागाला लोकल प्रवासात तोंड फुटते, हा मनात खदखदत असलेला दबलेला ज्वालामुखी स्फोटासारखा बाहेर येतो आणि सगळा राग, तणाव रिकामा करण्याचं साधन लोकल प्रवासात उपलब्ध होतं. केवळ हिंसेवरच भीस्त असलेले आणि हिंसेनेच सगळे प्रश्न सोडवता येतात, अशी 'भीती' बाळगणारेही लोकलच्या प्रवासात असताच. ही मंडळी चावी, नेलकटर, बॅगेचाच हत्यारासारखा वापर करून एकमेकांवर हल्ले करताना रेल्वेच्या प्रवासात अनेकदा दिसते. हाणामारी, भांडणे, मारामारी ही लोकलच्या प्रवासातली नियमित बाब आहे. मात्र ती चाकू किंवा तत्सम हत्यार भोसकून हत्या करण्यापर्यंत प्रवाशांची जाणारी मजल अत्यंत धोकादायक आहे. मुंबई ठाणेकरांचा संयम आता संपला असल्याचे निदर्शक आहे. लोकलमध्ये प्राध्यापकाची झालेली हत्या पूर्वनियोजित नसेल किंवा तणाव उन्मादातून किरकोळ कारणाने झालेली असली तरी त्याची मानसशास्त्रीय कारणे शोधण्याची गरज आहे. लोकलमध्ये एका पायावर उभे राहायला मिळणे म्हणजेच प्रवासातील सुख मानावे लागण्याच्या हतबल स्थितीच्या पलीकडे आपण गेलेलो आहोत. लोकलच्या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कामाच्या वेळा बदलणे, ट्रेनला स्वयंचलित दरवाजे बसवणे, अशा अनेक उपायांवर खूप चर्चा झाली. मुंबई ठाण्यातील उपनगरांतील लोकसंख्या पाहता उपलब्ध लोकल्सपेक्षा तिपटीने लोकल गाड्यांची गरज आहे. निदान गर्दीच्या वेळेत किंवा मेगा ब्लॉकच्या काळात तरी. मात्र मुंबई ठाण्याची रचना पाहता आता हे शक्य नाही. त्यामुळे पयार्यी वाहतुकीची साधने उपलब्ध व्हायला हवीत. सामान्य माणसाच्या जगण्यातील तणाव प्रचंड वाढलेला आहे. नोकरी टिकवणे, कार्यालयातील लेटमार्कमुळे वेतनकपात, कामातील रोजची आव्हाने आणि स्पर्धा वाढत आहे. कौटुंबिक गरजांबाबत कोणतीही शाश्वती नाही. घरकर्ज, इतर हप्ते, वेळेचे नियोजन, कुटुंबाच्या अपेक्षांची तजवीज, अशा अनेक गोष्टी निभावताना माणसांना स्वतःसाठी वेळ मिळतंच नाही. या सामान्य लोकल प्रवाशावरील कुटुंब आणि भवतालकडून असलेल्या अपेक्षांचा बोजा आताच्या काळात त्याच्या क्षमतेपलीकडे गेला आहे.



## छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

## तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

## धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!

**चेहऱ्यावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय –** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये ८६.३% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य–**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

## म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



## असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



## टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

### महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.


## महत्त्वाचा कानमंत्र

- बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.
- तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत. यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.



- फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.
- सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.
- केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.
- केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

## रंगाला अनुसरून करा मेकअप



**गोऱ्या रंगासाठी :**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.





**गडद रंगाच्या त्वचेसाठी :**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

**पिवळ्या रंगाची त्वचा :**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यूआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

**गव्हाळ त्वचेसाठी :**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

## डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण होतो.

**काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे –**

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

**डेंग्यू आघाताचे सिंड्रोम–**

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता जाणवते



## खाल्ल्या मिठाचे परिणाम

**खाल्ल्या** मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर असते.



मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.

## व्यायामाचेही व्यसन नको

**शरीर** तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.



एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते.

परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

## उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

**आपण** अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...



**पचनाचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वा-रंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

**किडनीचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

**सांधेदुखी –**

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

# सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने घेतला गळफास

## पहिली मुलगी अन् दुसऱ्यांदाही मुलगीच असल्याचं कळताच केला जबरदस्ती गर्भपात...



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणाची चर्चा अजून थांबलेली नाही, तोच उरुळी कांचन परिसरातून आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. समाजात सुसंस्कृतपणाचा मुखवटा लावून वावरणाऱ्या, पदं आणि प्रतिष्ठा मिरवणाऱ्या कुटुंबात एका उच्चशिक्षित इंजिनियर विवाहितेला हुंडा, संशय, अपमान आणि 'वंशाला दिवा हवा' अशा विकृत आग्रहामुळे जीव गमवावा लागला. सासू सरपंच, सासरे शिक्षकङ्ख पण घरातल्या चार भिंतीआड अमानवी छळ सुरू होता. अखेर या सगळ्याला कंटाळून इंजिनियर दीप्ती मगर-चौधरीने आत्महत्या केली आणि पुणे पुन्हा एकदा हादरलं.

**दीप्ती मगर-चौधरीने केली आत्महत्या**

उरुळी कांचनजवळील सोरतापवाडी येथे राहणाऱ्या दीप्ती मगर-चौधरी (वय २७) या पेशाने इंजिनियर असलेल्या विवाहितेने २५ जानेवारी रोजी रात्री आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे, अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकलीसमोर तिने हे टोकाचं पाऊल उचललं. दीप्तीचा मृत्यू हा आत्महत्या असल्याचं प्राथमिक तपासात स्पष्ट झालं असलं, तरी तिच्यामागे असलेली कहाणी अंगावर शहारे आणणारी आहे.

**अखेर आत्महत्या; तिन्ही वर्षांच्या मुलीसमोर टोकाचं पाऊल**

सततचा छळ, अपमान, संशय, पैशांची मागणी आणि जबरदस्तीचा गर्भपातङ्ख या सगळ्याला कंटाळून २५ जानेवारीच्या रात्री दीप्तीने आपल्या राहत्या घरी गळफास घेतला. तिच्या मृत्यूने संपूर्ण सोरतापवाडी हादरली.

**पती, सासू-सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल**

दीप्तीची आई हेमलता मगर यांनी दिलेल्या तक्रारीवरून उरुळी कांचन पोलिसांनी पती रोहन चौधरी, सासू व सरपंच सुनीता चौधरी, सासरे कारभारी चौधरी आणि दीर रोहित चौधरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पती आणि सासूला अटक करण्यात आली असून, त्यांना ३० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सासरे आणि दीर फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भेट**

या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मंगळवारी दीप्तीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत, "हा केवळ आत्महत्येचा नव्हे, तर हुंडाबळीचा प्रकार आहे," असं स्पष्ट केलं.

**गर्भपाताची स्वतंत्र चौकशी**

रुपाली चाकणकर यांनी सांगितलं की, गर्भपात कोणत्या रुग्णालयात करण्यात आला, कोणी केला, कोणाच्या सांगण्यावरून केला याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आदेश वैद्यकीय विभाग आणि पोलिसांना देण्यात आले आहेत.

**लग्नानंतर काही महिन्यांतच छळाला सुरुवात**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती आणि रोहन चौधरी यांचा विवाह २०१९ मध्ये पार पडला होता. लग्नावेळी माहेरकडून सुमारे ५० तोळे सोनं देण्यात आलं होतं. सुरुवातीचे काही महिने सुरळीत गेले, मात्र त्यानंतर दीप्तीच्या आयुष्यात छळ, संशय आणि अपमानाची मालिका सुरू झाली.

**'दिसायला सुंदर नाहीस', 'घरकाम येत नाही' - मानसिक छळ**

दीप्तीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर दीप्तीच्या चारित्र्यावर संशय घेतला जाऊ लागला. "तू दिसायला सुंदर नाहीस", "तुला घरातली कामं जमत नाहीत", "शेतात राबणाऱ्या बाया तुज्यापेक्षा बऱ्या" अशा शब्दांत तिला सातत्याने अपमानित करण्यात येत होतं. पती, सासू-सासरे आणि दीर यांच्याकडून मानसिक आणि शारीरिक छळ सुरूच होता.

**व्यवसाय, गाडीङ्ख आणि माहेरून पैशांची सतत मागणी**

पती रोहन चौधरी याचा एक्सपोर्टचा व्यवसाय बंद पडल्याचं कारण पुढे करत दीप्तीकडे माहेरून पैसे आणण्याची मागणी करण्यात आली. मुलीचा संसार वाचावा म्हणून दीप्तीच्या आई-वडिलांनी एकदा तब्बल १० लाख रुपये रोख दिले. मात्र यावरही समाधान न झाल्याने, चारचाकी गाडी घेण्यासाठी पुन्हा २५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. अखेर माहेरकडून एकूण सुमारे ३५ लाख रुपये देण्यात आले.

**५० तोळे स्त्रीधन बळकावल्याचा आरोप**

लग्नात दिलेलं सुमारे ५० तोळे सोनं चोरीची भीती दाखवून सासू आणि पतीने दीप्तीकडून काढून घेतल्याचा आरोप आहे. नंतर विचारणा केल्यावर हे सोनं व्यवसायासाठी बँकेत गहाण ठेवल्याचं तिला सांगण्यात आलं. दीप्तीचं स्वतःचं स्त्रीधनही तिच्या हातात राहिलं नाही.

**मुलगी झाल्यावर नाराजी, 'वंशाला दिवा हवा' असा विकृत हट्ट**

दीप्तीला पहिली मुलगी झाली. मात्र मुलगी झाल्याने सासरच्यांची नाराजी वाढली. 'वंशाला दिवा हवा' हा विकृत आग्रह घरात सतत ऐकवला जाऊ लागला. याच मानसिक दबावात दीप्ती आणखी खचत गेली.

**२०२५ मध्ये जबरदस्तीने गर्भलिंग निदान, त्यानंतर गर्भपात**

नोव्हेंबर २०२५ मध्ये दीप्ती पुन्हा गर्भवती होती. पाच महिन्यांची गरोदर असताना सासरच्यांनी तिच्यावर जबरदस्तीने गर्भलिंग निदान चाचणी करण्यासाठी दबाव टाकला. पोटातील बाळ मुलगी असल्याचं समजताच, दीप्तीचा विरोध डावलून तिचा जबरदस्तीने गर्भपात करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेनंतर दीप्ती पूर्णपणे कोलमडली होती.

**सरपंच सासू, शिक्षक सासरे... पण घरात अमानवी वागणूक**

ऑक्टोबर २०२५ मध्ये दीप्तीच्या सासू सुनीता चौधरी या सोरतापवाडीच्या सरपंच झाल्या. निवडणूक, राजकीय प्रतिष्ठा आणि 'मोठेपणा' दाखवण्यासाठी पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. तसेच माहेरच्या रो-हाऊस स्कीममध्ये हिस्सा मागण्यासाठीही दीप्तीवर दबाव टाकण्यात आल्याचं तक्रारीत नमूद आहे.

## पूल पाडण्याऐवजी मोनोपाइलने नवीन ब्रिज 'या' कोस्टल रोडवर उभारणार नवा पूल...

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईतील वर्सोवा ते दहिसर कोस्टल रोड बांधला जात असून मुंबई महानगरपालिकेने या रस्त्यावर नवा पूल बांधण्यासाठी अडथळ ठरत असलेल्या गोरेगावमधील वीर सावरकर उड्डाणपूल (एमटीएनएल) पाडण्याची योजना आखली होती. स्थानिक पातळीवर विरोध असल्याने, महानगरपालिकेने उड्डाणपूल न पाडता कोस्टल रोडवर 'मोनोपाइल' टेक्नॉलॉजी (एकच खांब) चा वापर करून नवीन पूल बांधण्याचा निर्णय घेतला. हा महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी 'आयआयटी'कडून टेक्निकल सल्ला देखील घेतला जात होता.

**स्थानिकांचा विरोध असल्याने नवीन तंत्रज्ञानाचा वापर**

या परिसरात कोस्टल रोडसाठी एक पूल बांधण्याचा प्रस्ताव होता. कोस्टल रोड ब्रिजसाठी लागणारी जागा आणि इतर टेक्निकल बाबी लक्षात घेता, वीर सावरकर उड्डाणपूल पाडण्याशिवाय पर्याय नसल्याची भूमिका महापालिकेने घेतली होती. स्थानिक लोक आणि लोकप्रतिनिधींनी याला तीव्र विरोध केला. त्यानंतर, महानगरपालिकेने मोनोपाइल तंत्रज्ञानाचा वापर करून वीर सावरकर उड्डाणपुलापासून कोस्टल रोडपर्यंत सुरक्षितपणे नवीन पूल बांधण्याचा निर्णय घेतला.



**मोनोपाइल ब्रिज बांधण्यासाठी मंजूरी**

'आयआयटी'च्या रिपोट्सनुसार, मोनोपाइल ब्रिज बांधण्यासाठी मंजूरी मिळाली आहे. मात्र, पूलाची बांधणी झाल्यानंतर त्याच्या खांबांमुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहतूक कोंडीचा धोका निर्माण होतो. त्यामुळे, आयआयटी मुंबईने पुलाच्या दोन्ही बाजूंचे रस्ते रुंद करण्याची शिफारस केली आहे. गोरेगावमधील वीर सावरकर उड्डाणपूल हा टळठछ पूल म्हणून देखील ओळखला जातो. हा उड्डाणपूल रेडिसन हॉटेलपासून रुस्तमजी ओझोन क्षेत्रापर्यंत पसरलेला असून २०१८ या पुलाचं उद्घाटन मध्ये झालं. त्यावेळी, पूल बनवण्यासाठी २७ कोटी रुपये खर्च झाले होते. आता, वसोर्वा ते दहिसर कोस्टल रोड सध्या सहा टप्प्यात बांधला जात असून महानगरपालिकेने कोस्टल रोडला दिंडोशी मार्गे माइंडस्पेस आणि पुढे गोरेगाव मुलुंड लिंक रोडला जोडण्यासाठी वीर सावरकर फ्लायओव्हर पाडण्याचा निर्णय घेतला होता.

## मुंबईकर राजकारणाला कंटाळले?

### निकालात 'नोटा'ची धक्कादायक आकडेवारी समोर!

■मुंबई । प्रतिनिधी,

नुकतीच मुंबई महापालिकेची निवडणूक पार पडली. यात मतदारांनी महायुतीच्या बाजून कौल दिलाय. असे असले तरी अनेक मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली. तर अनेकांनी नोटाचा पर्याय निवडला. यामुळे मुंबईकर राजकारणाला कंटाळलेयत का? असा प्रश्न यानिमित्ताने विचारला जातोय. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

**निवडणुकीत 'नोटा'चा मोठा वापर**

मुंबईतील महापालिका निवडणुकीत एकूण ५४ लाखांपेक्षा जास्त मतदारांनी मतदान केले. त्यातील सुमारे १ लाख ३२७ जणांनी 'नोटा' म्हणजेच नन ऑफ द अबव्ह हा पर्याय दाबला. हे एकूण मतदानाच्या १.८३ टक्के इतके आहे. याचा अर्थ असा की हे मतदार कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा देण्यास तयार नव्हते. ज्यामुळे मतदारांची नाराजी स्पष्ट झाली. मतदार आता अधिक जागरूक झाले आहेत आणि त्यांना पर्याय न आवडल्यास ते नकारात्मक मत व्यक्त करतात. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ५२.९४ इतकी होती. तरीही 'नोटा'चा हा आकडा लक्षवेधी आहे.

**क्षेत्रानुसार 'नोटा' मतांची विभागणी**

मुंबईच्या विविध भागांत 'नोटा'चा वापर वेगवेगळा दिसला. पश्चिम उपनगरात दहिसर ते बांद्रा सर्वाधिक ४७ हजार ९३६ मते 'नोटा'ला मिळाली. जी तेथील एकूण मतदानाच्या १.९ टक्के आहे. पूर्व उपनगरात भांडुप




ते सायन २९ हजार १०१ मते, म्हणजे १.७ टक्के, तर कोलाबा, माहिम आणि माटुंगा यासारख्या दक्षिण भागात २३ हजार २९० मते, जी १.८ टक्के इतकी आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागांत मतदारांच्या भावना कशा वेगळ्या आहेत आणि काही ठिकाणी उमेदवारांच्या निवडीबाबत अधिक असमाधान आहे.

**एका वाडार्तील सर्वाधिक 'नोटा' मते**

दक्षिण मुंबईतील वार्ड क्रमांक २२६ मध्ये 'नोटा'ला सर्वाधिक १ हजार ४०४ मते मिळाली. जी तेथील एकूण मतदानाच्या ५.१ टक्के आहे. या वार्डात मतदानाची टक्केवारी ५० टक्के होती. तरीही 'नोटा'चा हा प्रमाण इतर भागांपेक्षा जास्त आहे. याचा अर्थ असा की त्या भागातील मतदारांना उपलब्ध उमेदवार किंवा त्यांच्या धोरणांबाबत फारसा विश्वास नव्हता. काही विशिष्ट भागांत राजकीय असमाधान किती गंभीर आहे, हे यातून दिसून येते.

**'नोटा' पयार्याचे महत्त्व**

सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये 'नोटा' हा पर्याय सुरू करण्याचे आदेश दिले, जेणेकरून मतदारांना कोणत्याही उमेदवाराला न निवडता मतदानाचा हक्क बजावता येईल. यामुळे मतदारांची गोपनीयता राखली जाते आणि ते आपली नापसंती व्यक्त करू शकतात. पूर्वी मतदार फक्त घरबसल्या राहून असमाधान दाखवू शकत होते, पण आता 'नोटा'मुळे ते सक्रियपणे सहभागी होतात. हे पर्याय मतदारांना अधिक शक्तिशाली बनवते आणि राजकीय पक्षांना चांगले उमेदवार देण्यासाठी प्रोत्साहन देते.

**'नोटा'चा अर्थ**

'नोटा'ची ही संख्या मागील निवडणुकांशी तुलना करता फारशी दिलेली नाही, पण ती मतदारांच्या नाराजीचे सूचक आहे. यामुळे राजकीय पक्षांना आपल्या उमेदवारांच्या निवडीबाबत विचार करावा लागेल. भविष्यात अशा पयार्याचा वापर वाढल्यास निवडणुका अधिक पारदर्शक आणि जबाबदार होतील, असा विश्वास व्यक्त केला जातोय.

## मद्यपी चालकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करा!

■मुंबई । प्रतिनिधी,

कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या एसटीच्या चालक व इतर कर्मचाऱ्यांना कोणतीही तडजोड न करता तातडीने निलंबित करण्याचे सक्त निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. आज मुंबईतील परळ बसस्थानकाला दिलेल्या अचानक भेटीदरम्यान मंत्री सरनाईक यांनी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी विश्रांतीगृहांमध्ये अनेक ठिकाणी दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या, तसेच काही कर्मचाऱ्यांकडून मद्यपान केल्याची दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास आले. या गंभीर प्रकारामुळे संतप्त झालेल्या मंत्री सरनाईक यांनी तेथे उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, "परगावी कर्तव्य बजावणाऱ्या चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मात्र, अशा ठिकाणी मद्यपानासारखे निंदनीय कृत्य घडत असेल, तर ते केवळ शिस्तभंग नाही तर प्रवाशांच्या जीवाशी थेट खेळ करणारे अत्यंत धोकादायक कृत्य आहे."

"मद्यपान करून कर्तव्यावर जाणारा कर्मचारी केवळ अपघाताला निमंत्रण देत नाही, तर एसटीच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासावरही प्रश्नचिन्ह निर्माण करतो. अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांना चौकशीअंती सेवेतून बडतर्फ केले पाहिजे," असा इशाराही त्यांनी दिला. मात्र, अशा प्रकारांना वेळीच आळा न घालणारे अकार्यक्षम अधिकारीही तितकेच जबाबदार असल्याचे स्पष्ट करत मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीचे सुरक्षा व दक्षता खाते आणि संबंधित अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळेच अशा बेशिस्त वर्तनाला खतपाणी मिळते. त्यामुळे संबंधित सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यापुढे कर्तव्यावर जाणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची, विशेषतः चालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे चाचणी अनिवार्य करण्यात यावी. चाचणीत दोष आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेशही मंत्री सरनाईक यांनी दिले. तसेच आज आढळून आलेल्या गैरप्रकारांबाबत स्वतंत्र विभागीय चौकशी समिती नेमून, अहवालाच्या आधारे दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. या दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रसाधनगृहे आणि बसेसच्या नियोजनाचीही पाहणी केली. प्रवाशांच्या सुरक्षितता व सुखसुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



## मुंबईतील मालवणी परिसरात सिलिंडर ब्लास्ट... चाळीला आग

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईतील मालवणी परिसरात हादरवून टाकणारा प्रकार उघडकीस आला आहे. एका गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन मालवणी गेट क्रमांक ८ जवळ भारतमाता शाळेजवळील एसी मशिदीनजीकच्या चाळीत २७ जानेवारी रोजी मंगळवारी सकाळी ही घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेत चाळीला आग लागली आहे. सकाळी ९:२५ वाजता बीएमसी अग्निशमन दलाला या घटनेची माहिती देण्यात आल्याचे वृत्त आहे. अग्निशमन दल, पोलीस, तसेच संबंधित वीज वितरण कंपनीच्या कर्मचारी रुग्णवाहिका आणि बीएमसी वॉर्ड कर्मचारी तातडीने घटनास्थळी धावून आले होते.

पहिल्या मजल्यावर काही प्रमाणात आग होती, ज्यात सिलिंडरचा मुख्य व्हॉल्व्ह, गॅस स्टोव्ह,



एलपीजी सिलिंडर, एस शीट, घरगुती वस्तू, अन्नपदार्त आणि गाद्या देखील होत्या. अग्निळशमन दलाने सकाळी ९:४२ वाजेपर्यंत आग आटोक्यात आणली. या घटनेत एकूण सात जण गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमीपैकी चार जणांना आधार रुग्णालयात आणि तिघांना केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. काहींची प्रकृती ही गंभीर जखमी असल्याचे वृत्त आहे. सर्वांवर सध्या तपास सुरु असल्याचं बोललं जातंय.

**प्रजासत्ताक दिनी फुग्यात गॅस भरताना सिलिंडरचा झाला स्फोट, दुर्घटनेत सात जण गंभीर जखमी**

मालेगावात पोलीस परेडच्या मैदानापासून काही अंतरावर एका फुगे विक्रेत्याच्या नायट्रोजन गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या झालेल्या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे. या घटनेनं परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. या स्फोटात एकूण सात जण गंभीर जखमी झाले आहेत. राष्ट्रध्वजाला वंदन करताना ही धक्कादायक घटना घडली आहे. सोमवारी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी पोलीस परेड ग्राउंडवर राष्ट्रध्वजाला वंदन करण्यासाठी कार्यक्रम सुरु करण्यात आला होता. अतिरिक्त जिल्हाधिकारी वरिष्ठ पोलीस अधिकारी, मोठ्या संख्येनं शालेय विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते. परेड ग्राउंडपासून सुमारे २५० किमी अंतरावर एक फुगे



विक्रेता नायट्रोजन गॅसने फुगे भरून विक्रीचे काम करत होते. त्याच क्षणी, गॅस भरताना सिलिंडरमध्ये मोठा स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की, तो दूरवर ऐकू आला, नंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. एकूण सात जण स्फोटात जखमी प्रजासत्ताक दिनासाठी फुगे खरेदी करण्यासाठी काही नागरिकांनी विक्रेत्याभोवती गर्दी केली होती, तेव्हाच हा दुर्दैवी प्रकार उघडकीस आला. या अपघातात विनोद थोरात, मोहित जाधव, अतुल शेवाळे, प्रमिला जाधव आणि उज्ज्वला महाजन यांच्यासह इतर एकूण सात जण या स्फोटात जखमी झाले. दोन मुलं, दोन महिलांसह इतर आणखी दोघे जण गंभीर जखमी झालेत. सर्व जखमींना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

संबंधित घटनेची माहिती पोलिसांना समजताच, पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी तात्काळपणे घटनास्थळी पोहोचले आणि परिसराला घेराव घातला. नंतर फुगे फुगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायट्रोजन गॅस सिलिंडरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने हा स्फोट झाल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले. या घटनेनं आनंदाच्या दिवसाला विरजन प्राप्त झालं आणि पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com